संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# राष्ट्रवादी काँग्रेस आता महाराष्ट्रवादी

सध्या देशभरात दोन्ही काँग्रेसची परिस्थिती फारशी चांगली नाही. लोकसभा निवडणुकीमध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोघांनाही पराभवाचा जबरदस्त फटका सहन करावा लागला. काँग्रेसच्या ५० जागा पण निवडून न आल्याने या पक्षाला विरोधी पक्षाचा किंवा पक्ष नेते पदाचा मानसुध्दा मिळेनासे झाला आहे. तर तिकडे राज्यात राष्ट्रवादी काँग्रेसकडे मतांची पुरेशी टक्केवारी नसल्यामुळे या पक्षाची राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता आता धोक्यात आली आहे. निवडणूक आयोगाने तसे पत्रच राष्ट्रवादी काँग्रेसला पाठविले. राष्ट्रीय पक्ष म्हणवून घेण्यासाठी आवश्यक असलेली मतांची टक्केवारी आपल्याकडे नाही म्हणून आपली राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता का काढून घेण्यात येऊ नये, अशी विचारणा करणारी नोटीस राष्ट्रवादी काँग्रेसला दिली गेली. त्याला पक्षाने उत्तर पाठविले असले तरी राष्ट्रवादी काँग्रेसकडे मतांची पुरेशी टक्केवारी नाही हे स्पष्ट होते. स्वत:ला राष्ट्रीय पक्ष म्हणून मिरवून घेणारी राष्ट्रवादी काँग्रेस आता प्रादेशिक पक्ष म्हणून शिल्लक राहिल अशी विचित्र परिस्थिती दिसत आहे. दिल्लीत अनेक वर्षे सत्ताधारी असलेला काँग्रेस पक्ष आज विरोधी पक्ष म्हणून सुध्दा आपले स्थान टिकवू शकत नाही. तर अनेक वर्षे आपण राष्ट्रीय पक्ष आहोत असा गाजावाजा करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसला ते स्थान गमवावे लागते आहे. सत्तेच्या सारीपाटावर कोणाच्या सोंगटया कशा उलट पडतील हे सांगता येत नाही. एकेकाळी सर्वाधिक म्हणजे ४०० जागा जिंकणारा काँग्रेस पक्ष आज ४० जागांवर खाली कोसळला तर स्वत:ची राष्ट्रीय नेते म्हणून प्रतिमा निर्माण करणाऱ्या शरद पवारांच्या पक्षावर आपल्या राज्यातपुरतेच मर्यादित होण्याची वेळ आली आहे. राजकारणातल्या दैव गतीचा किंवा नियतीचा खेळच म्हणायला हवा. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सत्तेचा सर्वाधिक उपभोग घेतलेल्या या दोन्ही काँग्रेसची इतकी दारुण अवस्था होईल, असे कोणालाही वाटले नव्हते. मात्र आज अशी विपरित परिस्थिती या पक्षाबाबात उद्‌भवलेली आहे. सत्तेच्या या सम्राटांना सत्तेपासून अशा पध्दतीने वंचित राहण्याची वेळ आली आहे सत्ता मिळविणे आणि ती जास्तीत जास्त काळ टिकविणे हे काम फक्त आम्हालाच जमू शकते अशी आतापर्यंत या दोन्ही काँग्रेस आणि त्यांच्या नेत्यांची जमजूत होती. परंतु आता सत्ताचक्र उलट फिरल्याने त्यांची मोठी पंचाईत झाली आहे.

### दोन्ही काँग्रेस कात्रीत

काही दिवसापूर्वीच शरद पवार यांनी आरक्षणाच्या मुद्यांवरून आपल्याला कसा फायदा होईल याचे वर्णन केले होते. आम्ही ताकाला जाऊन भांडे लपवत नाही, असा खुलासाही त्यांनी केला होता. तर त्यांच्याच पक्षाचे जेष्ठ नेते छगन भुजबळ यांनी आता ताकही फुकून पिण्याची कशी वेळ आली आहे असे विधान नाशिक येथे केले होते. दोघांच्याही विधानामध्ये ताकाचाच उल्लेख व्हावा यावरून या पक्षाकडे सध्या ताकावर तहान भागण्याची वेळ आल्याचे स्पष्टपणे दिसते. काँग्रेसच्या कमी झालेल्या जागा आणि राष्ट्रवादी काँग्रेसची राष्ट्रीय पक्षावरून प्रादेशिक पक्षापर्यंत होत असलेली घसरण हे त्याचेच निदर्शक ठरते. खरे तर या पक्षाच्या नेत्यांना दूध मलई आणि सत्तेचे लोणी खाण्याची सवय आहे. त्यांच्यावर आता उद्‌भवलेल्या या घटना बघितल्यानंतर नक्कीच ताकावर समाधान मानण्याची नियतीने वेळ आणलेली दिसते. लोकसभा निवडणुकीत मतांची टक्केवारी खाली आली आणि आपल्या पक्षाचे महत्त्व आता विधानसभा निवडणुकीत तरी कसे टिकवावे अशा कात्रीमध्ये हे दोन्ही पक्ष सापडले आहेत. महाराष्ट्रात निवडणूकीतल्या पराभवाचे खापर कोणावर फोडावे यासाठी या दोन्ही पक्षाच्या नेत्यामध्ये स्पर्धा लागली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने लागलीच आपला प्रदेशाध्यक्ष बदलण्याचा प्रयोग केला आणि आणि आपण पराभवापासून कसा धडा घेत आहोत असे चित्र निर्माण करण्याचा प्रयत्नही चालविला आहे. काँग्रेसमध्ये अजून ठेच लागल्यानंतरही शहाणे होण्याची कोणाचीच तयारी दिसत नाही. मुख्यमंत्री हटावपासून ते प्रदेशाध्यक्ष बदलण्याच्या अनेक वल्गना आणि घोषणा होत आहेत. निवडणुकीच्या मैदानात या दोन्ही पक्षाचा कोणताच ठावठिकाणा नसताना पुन्हा जिंकून येण्याच्या वल्गना ते कोणत्या जोरावर करीत आहेत, हेच लक्षात येत नाही, खरी परिस्थिती स्वीकारण्याची त्यांची मानसिकता दिसत नाही. जिथे आपले अस्तित्व पणाला लागण्याची वेळ आली आहे तिथे या पक्षाच्या नेत्यांनी आपले पाय जमिनीवर राहतील याची काळजी घ्यायला हवी.

### राष्ट्रवादीवर ताकाचे भांडे वाचवण्याची आफत

खरे तर ही दोन्ही काँग्रेसच्या बाबतीत शोकांतिकाच ठरते. काँग्रेसमधून बाहेर पडलेले शरद पवार पंतप्रधान बनण्याचे स्वप्न पाहत होते. काँग्रेसला पर्याय देणारा पक्ष म्हणून त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली. मधल्या काळात देशाच्या अनेक भागात राष्ट्रवादी काँग्रेसने निवडणुकाही लढविल्या. परंतु या पक्षाच्या खासदारांची संख्या १८ ते १९च्या वर कधी केली नाही. निवडणूक घेणाऱ्यांमध्ये महाराष्ट्रातील खासदारांचे प्रमाण जास्त राहिले. हा पक्ष महाराष्ट्रात सत्तेचा जास्तवेळ भागीदार राहिला. महाराष्ट्रात काँग्रेसबरोबर असलेल्या युतीमुळे केंद्रसरकारमध्ये मंत्रिपदे मिळाली. परंतु हा शरद पवारांचा पक्ष आहे आणि शरद पवार महाराष्ट्राचे वजनदार नेते आहेत अशीच त्यांची देशभर प्रतिमा राहिल. आता तर मतांची टक्केवारी पण घसरल्यामुळे निवडणूक आयोगाला त्याची दखल घ्यावी लागली. निवडणूक आयोगाचा मतांच्या टक्केवारीचा जर निकष लावला तर राष्ट्रवादी काँग्रेस आता महाराष्ट्रवादी काँग्रेस म्हणून उरली आहे. असेच म्हणायला हवे. आता तरी पक्षाने सावध व्हायला हरकत नाही आणि विधानसभा निवडणुकीत आपली मतांची टक्केवारी आणखी घसरणार नाही, याची काळजी घ्यायला हवी. काँग्रेसबरोबर निवडणुकीसाठी जागा वाटपाचा समझोता करताना अनाठायी आत्मविश्वास न दाखविलेला बरा. निदान काँग्रेस बरोबरच्या युतीमुळे पक्षाच्या मतांची टक्केवारी थोडीफार वाढू शकेल. कारण सध्या देशभर बदलाचे वारे वाहत असल्यामुळे महाराष्ट्रात दोन्ही काँग्रेसकडे पुन्हा सत्ता राहिलच, याची कोणतीही हमी देता येत नाही. मतदारांकडे जाताना भांडे लपविण्याची वेळ या पक्षावर आता आलेली आहे. कारण शरद पवारांचा हा पक्ष राष्ट्रवादीवरून महाराष्ट्रवादी होत असल्याचे निवडणूक आयोगाने भांडे फोडले आहे. आता ताक तर दूरच राहिले परंतु भांडे तरी कसे वाचवायचे, असा प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेसपुढे निर्माण झाला आहे. यासाठी पुन्हा एकदा जनतेचा विश्वास संपादन करावा लागेल. विधानसभा निवडणुकीमध्ये आपली टक्केवारी वाढवावी लागेल. तेव्हा कुठे प्रादेशिक पक्ष म्हणून तरी आपले स्थान टिकवणे शक्य होईल.